संचालनालय, लेखा व कोषागारे , वित्त विभाग, महाराष्ट्र शासन,

ठाकरसी हाऊस, ३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शुरजी वल्लभदास मार्ग,

फॉरेन पोस्ट ऑफिस समोर, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२२२६२२०३६/६२२०२९ email: dd.admin@mahakosh.in/
jd.reforms@mahakosh.in

-: जाहिरात :-

गट "क" संवर्गातील सेवानिवृत्त सहाय्यक अधिक्षक,उपलेखापाल,कनिष्ठ लेखापाल कर्मचाऱ्यांना करार तत्त्वावर नेमणुक करणेबाबत.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१९/९०/प्र.क्र.१२/सेवा ७, दि.१९.०९.२०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची वेतननिश्चितीची पडताळणी करण्यासाठी ७ विभागीय कार्यालयाच्या स्तरावरील वेतन पडताळणी पथकामध्ये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहाय्यक अधिक्षक, उपलेखापाल, कनिष्ठ लेखापाल या गट "क" संवर्गाच्या सेवानिवृत्त कर्मचा-यांची कंत्राटी तत्त्वावर खालीलप्रमाणे विभाग स्तरावर नियुक्ती करावयाची आहे.

प्रत्येक प्रादेशिक स्तरावरील सहसंचालक कार्यालयातील वेतन पडताळणी पथकामध्ये **२-सहाय्यक अधिक्षक** (ग्रेड पे-४२००), **२-उपलेखापाल** (ग्रेड पे-४२००) व **१-कनिष्ठ लेखापाल** (ग्रेड पे-२८००) असे एकूण ५ कर्मचारी याप्रमाणे ७ वेतन पडताळणी पथक कार्यालयांमध्ये एकूण **३५** कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावयाची आहे.

अ.क्र	विभाग	विभागाचे नाव व पत्ता
१.	मुंबई	संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई, ठाकरसी हाऊस, ३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शुरजी वल्लभदास मार्ग, फॉरेन पोस्ट ऑफिस समोर, मुंबई-४०० ००१
२	कोकण भवन	सहसंचालक लेखा व कोषागारे,५०६ कोकण भवन, ५ वा मजला, नवी मुंबई
३	पुणे	सहसंचालक, लेखा व कोषागारे, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी आवार, पुणे
४	नाशिक	सहसंचालक लेखा कोषागारे, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी आवार, नाशिक
५	नागपूर	सहसंचालक लेखा कोषागारे, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी आवार, नागपूर
६	औरंगाबाद	सहसंचालक लेखा कोषागारे, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी आवार, औरंगाबाद
७	अमरावती	सहसंचालक लेखा कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती लेखा कोषभवन, दुसरा व तिसरा माळा, संत गाडगेबाबा विद्यापीठ रोड, अमरावती

१. कंत्राटी तत्त्वावर नेमलेल्या सेवानिवृत्त सहाय्यक अधिक्षक/उपलेखापाल/कनिष्ठ लेखापाल यांचे पदनाम "समंत्रक" असे राहील. सदर पदावर नियुक्ती करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांनी खालील कामे करणे आवश्यक राहील. **वेतननिश्चिती विषयक कामाचा अनुभव असणे अनिवार्य राहिल.**

अ. दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ दरम्यान सेवानिवृत्त झालेल्यांची सेवापुस्तकातील वेतननिश्चितीची पडताळणी करणे.

आ. प्रतिदिन किमान १५ सेवापुस्तके पडताळणी करणे.

इ. सेवा पुस्तक पडताळणीबाबतच्या वेतनिका प्रणालीमध्ये (ऑनलाइन) काम करावयाचे असल्यामुळे व दैनंदिन आवक जावक नोंदणी करावी लागणार असल्याने संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

ई. दैनंदिन/साप्ताहीक/मासिक अहवाल (आवक-जावक) संबंधित विभागाचे नियमित लेखा अधिकारी यांचे कडे सादर करणे आवश्यक राहील.

उ. सदर विषयाच्या अनुषंगाने येणारी इतर सर्व कामे.

२. या जाहिरातीव्दारे करावयाची नामिकासूची शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण -२७१५/ प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार करण्यात येईल व करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना याच शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रामिक देण्यात येईल. एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार कालावधीसाठी कायम राहील.

३. **गट "क" संवर्गाच्या कंत्राटी समंत्रकांची निवड, नेमणुक ही प्रादेशिक विभागीय स्तरावर होत असून इच्छुक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपले विहित नमुना अर्ज ते ज्या विभागात काम करण्यास इच्छुक आहेत त्या विभागीय सहसंचालक कार्यालयात टपालाद्वारे /हस्तपोच विहित मुदतीत सादर करावेत. संचालनालय स्तरावर यांसंबंधित कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. यापुर्वी महाकोषवर प्रसिद्ध करण्यात आलेलया नामिकासूचीबाबतच्या विविध जाहिरातींच्या अनुषंगाने "क" संवर्गाच्या कर्मचाऱ्यांनी अर्ज सादर केलेले असल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाहीत. तरी संबंधितांनी अर्ज नव्याने संबंधित विभागात अर्ज सादर करावेत.**

४. अर्जदाराने संबंधित विभागात अर्ज केल्याप्रमाणे कामाचे मुख्यालय मुंबई/नवी मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपुर असे राहील.

५. अर्ज सादर केला तरी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना काम मिळेल, याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांचा सेवापुस्तक वेतन पडताळणीच्या कामाचा किंवा वेतन निश्चिती व इतर प्रशासनिक कामाचा अनुभव व इतर अटी व शर्तींची पूर्तता यांचा विचार करून आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीकरीता

वरील शासन निर्णयानुसार प्रथमत: केवळ सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात येईल.

६. करार पध्दतीने अर्ज करताना अर्जदाराची कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसेल.

७. अशा कर्मचा-याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबत या कार्यालयाकडुन खातरजमा करण्यात येईल.

८. प्रादेशिक विभागीय सहसंचालक यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचारी यांच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

९. नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी यांनी त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१०. अशा करार पध्दतीवरील कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

११. अशा कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७-१२-२०१६ मधील व त्यानंतर वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१२. विहित नमुन्यातील अर्ज https://mahakosh.maharashtra.gov.in/index.php/en/career-with-us आणि https://www.maharashtra.gov.in//११४३/Careers या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १५.०१.२०२० पर्यंत राहील.**

Sd/-
(ज.र.मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक : - २१.१२.२०१९

ठिकाण : - मुंबई